परिपत्रक क्र. ५२३ दिनांक ०८/१२/२०१८

विषय :- सन २०१८ व सन २०१९ वृक्षरोपण कार्यक्रमाची अंमलबजावणी बाबत.

१. सन २०१८ आणि सन २०१९ मध्ये अनुक्रमे १३ कोटी आणि ३३ कोटी वृक्ष लागवडीचे उदिष्ट आहे. वृक्ष लागवडीचे उदिष्ट पुर्णपणे साध्य व्हावे आणि त्याचबरोबर आतापर्यत लागवड केलेल्या झाडांचे संरक्षण, देखभाल आणि संगोपन उत्तम रितीने होणे हे अत्यंत गरजेचे आहे.

२. धर्मादाय आयुक्त कार्यालय तसेच जिल्हा स्तरीय बैठकांमध्ये वृक्ष लागवड आणि संगोपन या संदर्भातील विषय प्रत्येक बैठकांच्या वेळी विषयसुचीमध्ये स्थायी विषय म्हणून अंतर्भुज करण्यात यावा. अशा बैठकामध्ये वृक्ष लागवडीचा आढावा, या पुर्वी लावलेल्या वृक्षांचे जिवंत राहण्याचे प्रमाण मृत वृक्षच्या जागी नवीन वृक्षांची लागवड, पुढील वर्षामध्ये वृक्ष लागवडीचा उदिष्टप्रमाणे वृक्षारोपणासाठी स्थळ निश्चित, रोपांची उपलब्धता आवश्यक त्या तांत्रिक परिगणाप्रमाणे विहित कालावधीमध्ये पिटस तयार करणे, निधी उपलब्धता इत्यादी संदर्भात पुर्ण तयारी बाबत आढावा घेण्यात यावा.

३. सन २०१८ मध्ये ९३,७५० वृक्ष व सन २०१९ मध्ये २,३४,३७५ वृक्ष लागवडचे उदिष्टाची प्रभावीपणे अंमजबजावणी करण्यासाठी धर्मादाय आयुक्त, यांचे अधिपत्याखालील कार्यालये, मंदिराचा परिसर व विविध न्यासात उपलब्ध असलेल्या जागी यांनी वृक्ष लावणे अपेक्षित आहे. त्यासबंधीचे कार्यालय निहाय रोपाची संख्या खालील दिलेल्या तक्तानुसार करणे आवश्यक आहे.

| कार्यालय | सन - २०१८ | सन - २०१९ |
|---|---|---|
| **धर्मादाय सह आयुक्त, कार्यालय,**<br>बृहन्मुंबई, पुणे, नाशिक, कोल्हापूर, लातूर, औरंगाबाद, अमरावती, नागपूर | प्रत्येकी ५,००० रोपे | प्रत्येकी १२,५०० रोपे |
| **धर्मादाय उप आयुक्त, कार्यालय**<br>ठाणे, अहमदनगर, जळगांव, सांगली, सोलापूर, बीड, नांदेड, अकोला, वर्धा<br>**सहाय्यक धर्मादाय आयुक्त, कार्यालय,**<br>रायगड, सातारा, धुळे, नंदुरबार, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, उस्मानाबाद, जालना, परभणी, हिंगोली, बुलढाणा, यवतमाळ, वाशिम, भंडारा, चंद्रपुर, गडचिरोली, गोंदिया | प्रत्येकी २२०० रोपे | प्रत्येकी ५,१७० रोपे |

(शि. ग. डिगे)
धर्मादाय आयुक्त
धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य,
मुंबई यांचे कार्यालय

प्रत :-

१. परिपत्रक धारिणी
२. सर्व धर्मादाय सह आयुक्त
३. सर्व धर्मादाय उप आयुक्त
४. सर्व सहाय्यक धर्मादाय आयुक्त
५. संगणक शाखा, मुख्यालय (प्रत वेबसाईटवर अपलोड करण्यासाठी)